**ARTHA**
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष २८ पुणे, बुधवार, १ मार्च, १९७२ अंक ५

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापडं



स्वच्छंद मजेत हवं तसं मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचं मोकळं मोकळं वाटणारं सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, केम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसींच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निर्धास्त वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसींच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. गाऊन्स, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसींचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेरिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई—१.

## परदेशी प्रवाशांपासून १९७१ साली झालेली प्राप्ती

भारतामधील प्रेक्षणीय स्थळे पाहाण्यासाठी परदेशातून हौशी प्रवासी नेहमीच येत असतात. त्यांच्या सुखसोयींची व्यवस्था करण्याचे कामही सरकारतर्फे चालू असते. एरव्ही अशा व्यवस्थेचा चांगला उपयोग होतो. परंतु युद्धासारखी अनिश्चित परिस्थिती उद्भवल्यास प्रवाशांच्या संख्येत घट होण्याची शक्यता असते. १९७१ सालच्या अखेरच्या काही महिन्यांत भारत व पाकिस्तान ह्यांचे संबंध अधिकाधिक बिघडत गेले आणि त्याचे पर्यवसान अखेर युद्धात झाले. त्यामुळे परदेशी प्रवाशांच्या संख्येत काही घट होणे अपरिहार्य होते. तरीही १९७१ साली भारताला ३ लाख परदेशी प्रवाशांनी भेट दिली. बांगला देशातून आलेल्या निर्वासितांच्या लोंढ्यामुळेही परदेशी प्रवासी एरव्ही-पेक्षा कमी प्रमाणात आले. १९७० साली परदेशी प्रवाशांच्या संख्येत जशी वाढ झाली तशी ती १९७१ साली अर्थातच होऊ शकली नाही. तरी सुद्धा १९७३ साली त्यांची संख्या वाढून ४ लाख प्रवाशांचे उद्दिष्ट गाठता येईल अशी अपेक्षा करण्यात येत आहे. अधिक प्रवासी आकर्षित करण्यासाठी जी प्राथमिक तयारी करावी लागते ती पूर्ण झाली असून हा धंदा वाढविण्यासाठी आणखीही प्रयत्न करण्यात येत आहेत. १९७१ साली परदेशी प्रवाशांच्या आगमनामुळे भारताला ४० कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळेल असा अंदाज करण्यात आला आहे. विमान-प्रवास सुखाचा व बिनधोक होण्यासाठी मुलकी विमान वाहतूक खाते आणि हवामान खाते ह्यांच्याकडून सतत व खात्रीची माहिती मिळण्याची आवश्यकता असते. ह्या बाबतीत दोन्ही खात्यांनी चांगली कामगिरी बजावलेली आहे. एअर इंडिआ व इंडिअन एअर लाइन्स ह्यांनी आपल्या खर्चात दरसाल २·९५ कोटी रुपयांची बचत करण्याची योजना आखली आहे. शिवाय विमान प्रवासाच्या भाड्यात सवलती देऊन अधिक कमाई करण्याचे प्रयत्न चालविले आहेत.

## मुंबईमधील वाहतुकीची समस्या कशी सोडवावी

मुंबईमधील रेल्वे वाहतुकीवर सध्याच अतिशय ताण पडलेला आहे. येत्या दहा वर्षांत मुंबईच्या परिसरात आणखी औद्योगिक विकास होणार असल्याने हा ताण अधिकच वाढणार आहे. मुंबईत भुयारी रेल्वे मार्ग बांधण्याच्या योजनेची तांत्रिक व आर्थिक दृष्टीने पाहणी करण्यात येत आहे. त्याशिवाय उंचा-वरून जाणारे रेल्वेमार्ग बांधण्याचीही अशीच पाहणी करण्यात येत आहे. जमिनीवरील रेल्वेमार्ग बांधण्यासाठी दर किलोमीटर-मागे १ कोटी रुपये खर्च येतो. उंचावरून जाणाऱ्या मार्गासाठी हाच खर्च दर किलोमीटरमागे ३ ते ५ कोटी रुपये येतो. फारसा खोल नसलेला भुयारी रेल्वेमार्ग बांधण्यासही त्याच प्रमाणात खर्च येतो. उलट, खोल भुयारांतून रेल्वेमार्ग बांधावयाची झाल्यास दर किलोमीटरमागे ७ कोटी रुपये खर्च येईल. ह्याशिवाय भूस्तरविषयक आणि एंजिनिअरिंगविषयक अनेक प्रश्न सोडवावे लागतील ते वेगळेच.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-२६३३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.





☆ अर्थ ☆

बुधवार, १ मार्च १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## खाजगी उद्योगधंद्यांना मदत देण्यास रशिआ तयार

हिंदमधील खाजगी मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांशी सहकार्य करण्याचे प्रयत्न रशिआ करीत आहे. हे सहकार्य व्यापारी तत्त्वावर करण्याची तयारी दाखविण्यात आली असून ज्या खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना मदत देण्यास रशिआ तयार आहे अशा ५८ उद्योगधंद्यांची यादी भारत सरकारला पुरविण्यात आली आहे. भारत सरकारच्या औद्योगिक विकास-खात्याने ज्या उद्योगधंद्यांना परदेशीय सहकार्याची गरज आहे अशा १२१ उद्योगधंद्यांची जंत्री प्रसिद्ध केली होती. त्यांतील ५८ उद्योगधंद्यांची रशिआने निवड केली आहे. आतापर्यंत रशिआने सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांनाच मुख्यतः यंत्र-सामग्री आणि इतर साधने पुरविलेली आहेत. खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांना फारच अल्प प्रमाणात पुरवठा करण्यात आलेला आहे. हिंदमध्ये रशिआकडून मिळालेल्या सहकार्याने चालू झालेल्या खाजगी मालकीच्या औद्योगिक संघटना सुमारे १०–१२ च आहेत. रशिआकडून नव्याने मिळणाऱ्या सहकार्याची व्याप्ती पैशापर्यंत अर्थातच पोचलेली नाही. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना औद्योगिक साधनसामग्री पुरविण्यापुरतीच ही व्याप्ती आहे. रशिया आणि भारत ह्यांच्या दरम्यानचा व्यापार वाढत असला तरी तो फार मोठ्या प्रमाणावर नाही. भारताला करण्यात येणाऱ्या निर्यातीच्या बाबतीत गेल्या सहा वर्षांतील चित्र फारसे चांगले नाही. ह्या कालावधीत रशिआची निर्यात अवघी १२० कोटी रुपयांच्या आसपास घोटाळत राहिली आहे. ह्यापैकी बरीचशी निर्यात सार्वजनिक मालकीच्या विभागासाठी करण्यात येते आणि त्याची किंमत रशिआने दिलेल्या कर्जातूनच देण्यात येते. भारताशी होणारा व्यापार वाढवावयाचा असेल तर त्यांत अधिक विविधता आणण्याची आवश्यकता स्पष्ट दिसू लागली आहे. म्हणून खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांशी व्यापारी संबंध जोडणे आवश्यक वाटू लागले आहे. त्यामुळे रशियात मालाची मागणी वाढू शकणार आहे.

## स्वावलंबी अर्थव्यवस्थेच्या निर्मितीचे उद्दिष्ट

कलकत्ता येथे सायन्स काँग्रेसच्या ५९ व्या अधिवेशनाचे उद्घाटन करताना नियोजन मंत्री श्री. सुब्रह्मण्यम ह्यांनी स्वावलंबी अर्थव्यवस्थेच्या निर्मितीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. आपल्या भाषणात ते म्हणाले की स्वावलंबी अर्थ-व्यवस्था निर्माण करण्याच्या कार्यात शास्त्रज्ञांनी आणि तंत्रज्ञांनी संपूर्ण सहकार्य दिले पाहिजे. तरच उपलब्ध साधनसामग्रीचा अधिकात अधिक उपयोग करता येणे शक्य होईल. अशा अर्थ-व्यवस्थेची उभारणी त्वरेने होण्यासाठी जी परिस्थिती लागते ती आता उत्पन्न झालेली आहे. आता जरूर आहे ती अग्रक्रम लावण्याची, मार्गदर्शनाची आणि संस्थासंघटनांच्या पाठिंब्याची. भारतासारख्या खंडप्राय देशाला स्वावलंबी अर्थव्यवस्थेची अत्यंत गरज आहे. देशाचे राजकीय अगर आर्थिक हितसंबंध दुसऱ्या देशांच्या धोरणामुळे धोक्यात येण्याचे टाळावयाचे असेल तर स्वावलंबी अर्थव्यवस्थेला दुसरा पर्याय असू शकत नाही. पण अशी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रथम शास्त्रीय व तांत्रिक दृष्टीने भक्कम असा पाया घालण्यात आला पाहिजे. तरच देशाचा मागासपणा आणि परावलंबन ह्यांच्या चक्रातून सुटका करून घेता येईल. ह्याविषयाचा विचार करताना हरित क्रांतीकडे सहजच लक्ष जाते. शेतीमधील हरित क्रांती होण्यापूर्वी प्रथम परदेशांतून तांत्रिक ज्ञान घ्यावे लागले. परंतु ह्या तांत्रिक ज्ञानाचे रूपांतर करून येथील परिस्थितीशी जुळणारे बदल घडवून आणण्यासाठी देशातच संशोधन करावे लागले. त्यातूनच अधिक प्रमाणात पिके देणारी बी-बियाणे सापडली आणि हरित क्रांती प्रत्यक्षात अवतरली. म्हणूनच शास्त्रीय विचारपद्धती ही शाळा-कॉलेजांतील वर्गात नेली पाहिजे व नंतर ती सामान्य माणसांपर्यंत पोचविण्यात आली पाहिजे. हे कार्य दळणवळणाच्या आधुनिक साधनांनी सहज करता येईल.

## बँकिंगच्या प्रचारासाठी चित्रपटांचे साहाय्य

सार्वजनिक मालकीच्या बँकांतर्फे ग्रामीण भागात बँकिंगच्या सवयीचा प्रसार व्हावा म्हणून चित्रपटांचे साह्य घेण्याची योजना आखण्यात येत आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाचे प्रमुख विकास-अधिकारी श्री. जी. आर. पांशे ह्यांच्या नेतृत्वाने एका कार्यकारी गटाची स्थापना करण्यात आली आहे. चित्रपट तयार करण्यासाठी भारत सरकारची फिल्म्स डिव्हिजन आणि फिल्म इन्स्टिट्यूट ह्यांचे सहकार्य घेण्यात येत आहे. चित्रपट तयार झाल्यावर ते सरकारी माहितीपटाबरोबरच चित्रपटगृहातून दाखविण्यात येण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागांतील बँकांच्या शाखांना शक्य तितक्या लवकर आपल्या पायावर उभे करण्याच्या कामी अशा चित्रपटांचा उपयोग होईल. ग्रामीण भागांतील लोकांना बँकेपासून होणारे फायदे समजाऊन देऊन बँकांचा प्रसार वाढविण्यासही त्यांची मदत होईल अशी अपेक्षा आहे.

## विजयंता रणगाड्याला नवा चक्षू

गेल्या डिसेंबर महिन्यात झालेल्या भारत-पाक युद्धात भारताचा जय झाला असला तरी संरक्षणाची तयारी ढिली करून चालणार नाही असा इशारा जाणते देत आहेत. स्वतंत्र परराष्ट्रीय धोरण आखून ते अमलात आणण्यासाठी देश संरक्षणाच्या बाबतीत तरी स्वयंपूर्ण बनविणे निकडीचे आहे. त्या दृष्टीने पावले टाकण्यात येत आहेत. भारताने बनविलेल्या 'विजयंता' रणगाड्याने आपली कार्यक्षमता दाखवून दिली आहे. तथापि, रात्रीही कामगिरी करू शकणाऱ्या काही परदेशीय रणगाड्यात बसविण्यात आलेला 'चक्षू' या रणगाड्यात समाविष्ट नव्हता. आता तीही उणीव भरून काढण्यात येत आहे. अंधाऱ्या रात्री शत्रूंच्या ठाण्यावर अचूक गोळीबार करता यावा म्हणून विजयंतात एक नवीन प्रकारचा शोधक दिवा बसविण्यात येत आहे. त्यात 'इन्फ्रा रेड' किरणांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यांच्या साहाय्याने रणगाड्याच्या सामर्थ्यशाली तोफा रात्रीही शत्रूवर आग ओकू शकतील. सध्या नव्या दिव्याची चाचणी करण्यात येत आहे. "विजयंता" रणगाडा आवडी येथील कारखान्यात तयार करण्यात येतो. रणगाड्यास लागणारे सुटे भाग सर्वच्या सर्व देशातच बनविलेले असावे असा कटाक्ष ठेवण्यात येत आहे. सध्या रणगाड्यातील ६० टक्के भाग देशी बनावटीचे असतात. ह्यापूर्वी ही टक्केवारी आणखी कमी होती. आणखी दोनतीन वर्षांत ८५ टक्के भाग देशी बनावटीचे वापरण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रणगाड्याला लागणारा पोलादाचा पत्रा रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्यात निर्माण करण्यात येतो. कारखान्याचे उत्पादन अजून सर्व गरज भागविण्याइतके होत नाही. ते वाढवून सध्या अल्प प्रमाणात करण्यात येणारी पोलादाच्या पत्र्याची आयात पूर्णपणे बंद करण्याची खटपट चालू आहे.

---

## कृत्रिम उपग्रहांचा ग्रामीण भागाला फायदा

मानवनिर्मित उपग्रह अवकाशात भ्रमण करण्यासाठी सोडण्यात येतात. ह्या उपग्रहाचा उपयोग मनुष्याचे जीवन अधिक समृद्ध करण्यासाठी कसा होऊ शकेल ह्याची कल्पना आर्थर क्लार्क नावाच्या अमेरिकन लेखकाने मुंबई येथे बोलताना दिली. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च येथे बोलताना ते म्हणाले की पृथ्वीभोवती भ्रमण करणाऱ्या उपग्रहामुळे दळणवळणाच्या बाबतीत क्रांतिकारी बदल होईल. खेड्यांतून शहराकडे जाणाऱ्या स्थलांतरितांचा ओघ मंदावेल आणि फार मूलगामी सामाजिक बदल घडून येतील, आणि हे सर्व घडून येण्यास फार थोडी वर्षे लागणार आहेत. हिंदमधील लक्षावधी ग्रामीण लोकांना आधुनिक युगात प्रवेश करण्याचे एक मोठे साधन उपग्रहांच्यामुळे मिळेल. त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांची मदत होईल. ग्रामीण भागातील लोकांना दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम सहज दाखविण्यास ह्यासारखे अमोल साधन नाही. त्याशिवाय उपग्रहाच्या साहाय्याने भूस्तरात व समुद्रात दडलेल्या साधनसामग्रीचा तपास करण्यात त्यांची मदत होऊ शकेल. वनस्पतींवर पडलेल्या रोगांची माहिती मिळविणे आणि समुद्रात संचार करणाऱ्या माशांच्या हालचालींवर नजर ठेवणे अशी कामे उपग्रहामार्फत घेतलेल्या छायाचित्रांनी करता येतील. सध्या जगातील अनेक भागांत माहिती पोचविणे हे अवघड काम आहे. परंतु ह्या शतकाच्या अखेरीस टेलेकम्युनिकेशन्सच्या सोयी इतक्या वाढतील की पृथ्वीवरील कोणत्याही माणसाला कोणत्याही इतर ठिकाणच्या माणसांशी संपर्क साधणे सुलभ होऊन जाईल. मग कदाचित वृत्तपत्रांची गरजच भासणार नाही. मनात आले तर टेलिफोनसारख्या तबकडीवरील नंबर फिरवून कोणत्याही वृत्तपत्राच्या कोणत्याही दिवसाच्या अंकाचे पहिले पान त्याला दूरचित्रवाणीवर वाचता येईल. मि. आर्थर क्लार्क हे शास्त्रीय कल्पनाविलासावर आधारलेली पुस्तके लिहिणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. पण, त्यांचा प्रस्तुतचा कल्पनाविलास शास्त्रीय सत्यावर आधारलेला आहे.

---

## पाकिस्तानमधील लोकांना पानपट्टी दुर्मिळ झाली

भारत-पाकिस्तान युद्धाचा एक परिणाम म्हणून पाकिस्तानात विड्याच्या पानांची तीव्र टंचाई भासू लागली. त्यांच्या किमती भरमसाट वाढू लागल्या आणि सामान्य पाकिस्तानी नागरिकाला विडा चघळण्याची तलफ भागविणे अशक्य झाले. आता विड्याच्या पानाऐवजी साळढचे पान, पेरूचे पान, इत्यादी वापरण्यात येऊ लागली आहेत, आणि ह्या पानांची मागणीही भलतीच वाढली आहे. पाकिस्तानला विड्याच्या पानांचा पुरवठा मुख्यतः पूर्व पाकिस्तानातून म्हणजे आताच्या बांगला देशातून होत असे. पण आता तेथून विड्याची पाने अर्थातच येत नाहीत. भारत पाकिस्तानला पाने पुरवू शकेल. परंतु युद्धानंतर उभयता देशांतील व्यापारी संबंध नष्ट झालेले आहेत. भारताशिवाय ब्रह्मदेश व सिलोनही पाने पुरवू शकतील. येथे अडचण येते परदेशीय चलनाच्या टंचाईची. पाकिस्तानची अर्थव्यवस्था युद्धाने अतिशय दुबळी झाली आहे. तेव्हा तिला पुन्हा भक्कम पायावर उभे करण्यासाठी परदेशीय चलन अत्यंत आवश्यक झाले आहे. अशा स्थितीत पान खाण्याच्या तलफेसाठी परदेशीय चलन कोठून मिळू शकणार? पाकिस्तानात विड्याच्या पानाच्या आयातीवर व विक्रीवर हजारो कुटुंबांचे संसार चालत असत. पाने येण्याचे बंद झाल्याबरोबर त्यांच्या उत्पन्नावर गदा आली. पानाच्या विक्रीवर अवलंबून असलेल्या २० हजार विक्रेत्यांनी प्रे. भुत्तो ह्यांना तार पाठवून विड्याच्या पानांच्या आयातीला थोडेबहुत परवाने द्यावे अशी मागणी केली आहे. दरम्यान पाकिस्तानात विड्याच्या किमती भरमसाट वाढल्या आहेत. जमणारे पान हवे असेल तर ग्राहकांना १॥ रुपये द्यावे लागतात. पूर्वी पानाच्या कोठल्याही दुकानात ४ पैशाला पान मिळत असे. पान खाणे ही पाकिस्तानी नागरिकांची तलफ राहिलेली नाही. ही एकच चैनीची बाब त्यांना उरली आहे. काही काही बहाद्दर दररोज १० पाने खाणारे आहेत. त्यांची पंचाईत तर विचारूच नये.

### ग्रामीण विद्युतमंडळाला अमेरिकेची मदत

ग्रामीण भागात विजेचा पुरवठा करण्याचे काम सर्व राज्यांत कमी-अधिक वेगाने करण्यात येत आहे. परंतु हे काम इतके अवाढव्य आहे की ते पुरे करण्याच्या कामी जितकी त्वरा दाखवावी तितकी कमीच पडत आहे. ग्रामीण भागात विजेचा पुरवठा करण्यासाठी रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन कार्यरत आहे. विकासाच्या अनेक कामाला जसा पैशाचा पुरेसा पुरवठा होत नाही, तसाच कॉर्पोरेशनला होत नाही. त्यासाठी कॉर्पोरेशनच्या कार्याचा विस्तार करणे आवश्यक आहे आणि विस्तारासाठी अधिक द्रव्याची गरज आहे. कॉर्पोरेशनला मदत व्हावी म्हणून अमेरिकेतर्फे २२·३ कोटी रुपयांचा चेक कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. वेंकटपय्या ह्यांना भारतामधील अमेरिकेचे राजदूत श्री. कीसिंगर ह्यांनी दिला. १९६९ साली भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान ग्रामीण वीजपुरवठा योजनाबाबत एक करार करण्यात आलेला आहे. ह्या कराराप्रमाणे भारताला अमेरिकेकडून १०५ कोटी रुपये मिळावयाचे आहेत. नुकतीच देण्यात आलेली रक्कम ही कराराप्रमाणे मिळावयाच्या रकमेचाच एक भाग आहे. आतापर्यंत ह्या कामासाठी अमेरिकेने भारताला ४९ कोटी रुपयांची रक्कम देणगीदाखल दिलेली आहे. उरलेली रक्कम चौथा पंचवार्षिक कार्यक्रम पूर्ण होण्याच्या आधी दिली जाईल अशी अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था गतिमान करण्याच्या कामी विजेचा पुरवठा ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. कॉर्पोरेशनने आखलेल्या योजनांना असाच पैशाचा पुरवठा होत राहिल्यास येत्या दोनतीन वर्षांत ग्रामीण भागाचे चित्र आमूलाग्र बदलून जाण्याची शक्यता आहे. आतापर्यंत कॉर्पोरेशनने १८,००० ग्रामीण वीजपुरवठा योजनांना द्रव्यसाहाय्य केलेले आहे. त्यामुळे २ लाख, ७० हजार विजेचे पंप चालू करून पाणीपुरवठा करण्यात येऊ लागला आहे. त्याशिवाय ४० हजार छोट्या उद्योगधंद्यांना विजेची शक्ती पुरविण्यात येऊ लागली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ५ लाख वीजपंप चालू करण्याचे ठरविण्यात आले आहे.

---

### अणुबॉंबच्या वापराचा भीषण वारसा

इंडोचायनात अमेरिकेने चालू ठेवलेल्या युद्धात संहाराची अनेक भीषण साधने वापरण्यात येत आहेत. अमेरिकेविरुद्ध लढणाऱ्या तेथील स्थानिक लष्कराला तशाच प्रकारची भयंकर साधने रशियाने पुरविली आहेत. तथापि भौतिक शास्त्रज्ञानाचा वापर करून माणूस किती दुःखदायक घटनांचा पाया घालीत आहे ह्याची कल्पनाही करवत नाही. १९४५च्या आगस्टमध्ये नागासाकी ह्या जपानी बंदरावर अमेरिकेने अणुबॉंब टाकला; युद्धाची इतिश्री झाली आणि त्या अभागी शहरातील अनेक लोकांवर अदृश्य मृत्यूचे पाश आवळत चालले. बॉंबचा स्फोट झाल्यापासून दर साल अनेक जण त्यापासून झालेल्या दुष्परिणामाला बळी पडत आहेत. गेल्या वर्षी २,०१५ लोक मृत्युमुखी पडले. १९७० साली २,१५० लोक दगावले होते. त्यांपैकी बहुतेक लोक अणुकिरणांपासून निघालेल्या परिणामाने पीडित झालेले होते. कॅन्सर ह्या रोगाची अनेक लोकांना बाधा झालेली होती. गेल्या वर्षी मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या धरून आतापर्यंत ४३,७३६ लोक अणुबॉंबच्या स्फोटातून उद्भवलेल्या कारणांनी कालवश झालेले आहेत. नागासाकी शहरावर जेव्हा अणुबॉंब टाकण्यात आला त्या वेळी पहिल्या क्षणक्यातच ७३,८८४ नागरिकांनी परलोकाचा रस्ता धरला. त्यापूर्वी तीन दिवस आधी हीरोशिमा ह्या ४०० किलोमीटर पूर्वेस असलेल्या जपानी शहरावर अणुबॉंब टाकण्यात आला होता. हिरोशिमावर टाकण्यात आलेल्या बॉंबच्या परिणामापासून दरसाल सुमारे १,००० जपानी नागरिक मरण पावतात असा अंदाज करण्यात आलेला आहे. शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग विनाशासाठी करावयाचा ह्यासंबंधीचे निर्णय घेऊन ते अमलात आणू शकणारी आंतरराष्ट्रीय संघटना अद्यापि अस्तित्वात आलेली नाही. तोपर्यंत अशा ज्ञानात आघाडीवर असणारी राष्ट्रे स्वतःच्या तात्कालिक अगर दीर्घकालिक फायद्यासाठी ते ज्ञान वापरीतच राहणार. दरम्यानच्या काळात मागासलेल्या देशांना बड्या देशांची आपसातील चुरस भोवत राहणार आहे.

---

### रा. स्व. संघाच्या गुरुदक्षिणेवर इनकम टॅक्स!

इनकम टॅक्स खात्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर नोटीस बजावून इनकम टॅक्सची रिटर्न्स भरून दाखल करण्यास सांगितले होते. संघाचे सरचिटणीस श्री. देवरस ह्यांच्या रिट पिटिशनवरून मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचने तात्पुरती तहकुबी दिली होती; इनकम टॅक्स खात्याची कारवाई थांबविण्याचा हुकूम द्यावा, अशी त्यांची मागणी होती. इनकम टॅक्स कायद्याप्रमाणे संघ कराची आकारण्याजोगी संस्था आहे किंवा नाही हे इनकम टॅक्स खात्याने ठरवीपर्यंत हायकोर्टाला मध्ये पडता येणार नाही, असे खात्याचे म्हणणे होते. 'गुरुदक्षिणा' ह्या स्वरूपात मिळणारे पैसे इनकम टॅक्स कायद्याच्या कक्षेत येत नाहीत, असा श्री. देवरस ह्यांचा दावा होता. उभय पक्षांच्या संमतीने नागपूर बेंचने खालील प्रमाणे ठरविले. "नागपूरच्या इनकम टॅक्स अधिकाऱ्याने संघावर कर आकारला, तर अपेलेट असिस्टंट कमिशनरकडे केल्या जाणाऱ्या अपिलाचा निकाल लागेपर्यंत संघाला डिफॉल्टर समजले जाणार नाही. नागपूर व्यतिरिक्त संघाच्या इतर शाखांवर नोटिसा बजावल्या असतील, तेथे इनकम टॅक्स अधिकाऱ्यांनी नागपूरच्या इनकम टॅक्स ऑफिसरच्या निकालापर्यंत कारवाई स्थगित करावी अशी सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हिन्यूने त्यांना सूचना द्यावी."

---

### तेलाच्या चोऱ्यांमुळे ऑईल कॉर्पोरेशनला चिंता

सरकारच्या मालकीच्या इंडिअन ऑईल कॉर्पोरेशनच्या तेलाच्या नळांतील रॉकेल व पेट्रोल चोरून काढून घेण्याचे प्रकार आढळून आल्यामुळे चिंता उत्पन्न झाली आहे. हल्दिआ-बरौनी-कानपूर ह्या शहरांना जोडणाऱ्या तेलाच्या नळांतून १९६८ साली अशा चोऱ्या झाल्याचे आढळून आले. अगदी अलीकडेही आणखी एक चोरी दिसून आली. चोरी करणारे भामटे तेलाच्या नळाला भोक पाडतात, आणि त्यात एक छोटी नळी घालतात. थोड्याच अंतरावर तेलाची वाहतूक करणाऱ्या मोटरगाड्या उभ्या असतात. त्या आपल्या टाक्या मालाने भरून घेतात व निघून जातात. तेलाचे नळ साधारणपणे जमिनीत १ मीटर खोलीवर घातलेले असतात. चोरट्याचे काम झाल्यावर नळातील छिद्रामधून तेल वाहतच राहते. नळात तेल भरण्याची वेळ येईल तेव्हा ही गळती उघडकीस येते. इंडिअन ऑईल कंपनीचे स्वतःचे सशस्त्र रक्षक नाहीत. दिवसा काही साधे पहारेकरी नळावर लक्ष ठेवतात; परंतु रात्री त्यांच्या रक्षणाची काहीच तजवीज नसते. चोरट्यांची करामत उघडकीस आल्यावर छिद्र बुजण्याची कारवाई सुरू होते. परंतु त्यासाठी चार-पाच दिवस लागतात. अर्थातच ह्या दुरुस्तीच्या काळात नळात तेल भरण्याचे काम बंद ठेवावे लागते. तेलाच्या व पेट्रोलच्या पुरवठ्यात अशा रीतीने अडथळा उत्पन्न होतो. त्याचा परिणाम म्हणून कधी कधी रॉकेलसारख्या गरजेच्या वस्तूचा देशात कोठे तरी तुटवडा भासू लागतो. इंडियन ऑईल कंपनीने हे सर्व प्रकरण बिहार सरकारच्या मुलकी खात्याकडे व पोलिस खात्याकडे विचारार्थ पाठविले आहे. बिहार सरकारचे पोलिस खाते हे चोरीचे प्रकार थांबविण्याचे प्रयत्न करीत आहे. त्याचप्रमाणे गुन्हेगार लोकांना पकडण्यासाठीही कोशीस करण्यात येत आहे. परंतु अद्याप तरी गुन्हेगाराचा थांगपत्ता लागलेला नाही.

---

### ढाका शहराचा पाडाव झटपट कसा झाला?

डिसेंबर महिन्यात झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धात ढाका शहराचा पाडाव इतका झटपट होईल अशी अपेक्षा नव्हती. हिंदी लष्कराचा वेढा शहराभोवती बसला होता आणि ते तोफखान्याच्या माऱ्यात आले होते. परंतु जरूर त्या तोफा व रणगाडे अद्याप म्हणजे १४ डिसेंबरपर्यंत शहराजवळ आले नव्हते. त्याशिवाय अखेरची चढाई करता येणेही शक्य नव्हते. निर्णायक लढाईसाठी लागणारी सामग्री जुळविण्यास हिंदी लष्कराला एक आठवडा तरी लागला असता आणि मग धुमश्चक्री होऊन ढाक्याचा पाडाव झाला असता. पण, ह्या वेळी एक अनपेक्षित घटना घडली. १४ डिसेंबरला ढाक्याहून इस्लामाबादला धाडण्यात येत असलेला एक संदेश दिल्लीतील लष्करी माहितीकेंद्राने ऐकला. वेळ सकाळची सुमारे ११ वाजताची होती. हिंदी लष्कर शहरावर अखेरचा ठोला लगावण्याच्या पवित्र्यात असल्याने पुढील डावपेचाबद्दल निश्चित सूचनांची मागणी संदेशात करण्यात आली होती. त्याचबरोबर दुपारी १२ वाजता सर्व सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक गव्हर्नर ए. एम. मलिक ह्यांच्या निवासस्थानी भरविण्यात येणार असल्याचेही संदेशात म्हटले होते. तत्पूर्वी तातडीच्या सूचनांची मागणी करण्यात आली होती. हा संदेश दिल्लीत पकडण्यात आला त्या वेळी संरक्षणमंत्री व हिंदी सेनादलाचे प्रमुख ह्यांची सकाळची बैठक चालू होती. बैठकीने तावडतोब निर्णय घेतला आणि शिलाँग येथील वायुदलाच्या केंद्राला ढाक्याच्या गव्हर्नराच्या निवासस्थानावर योग्य वेळी हल्ला करण्याचा हुकूम देण्यात आला. हुकमाची अंमलबजावणी करण्याचे काम केंद्राने दोन मिग २१ वैमानिकांना सांगितले. पण त्यांच्याजवळ ढाका शहराचे लष्करी नकाशे नव्हते. अर्थातच गव्हर्नरांचा आसरा नेमका शोधून मारा करणे कठीण होते. अखेर प्रवाशांना मार्गदर्शन करणारे नकाशे बरोबर घेऊन वैमानिक निघाले. नकाशात शहरातील मुख्य मुख्य इमारती दाखविलेल्या होत्या. त्या अनुरोधाने गव्हर्नरांच्या घरावर नेमका हल्ला करण्यात आला आणि त्याचा तावडतोब परिणाम होऊन गव्हर्नरांनी राजीनामा दिला. इतिश्रीचा हा प्रारंभ ठरला.

---

### भुत्तोच्या कोलांट्या उड्या चालूच

पाकिस्तानचे अध्यक्ष भुत्तो हे सोईप्रमाणे बोलण्यात पटाईत आहेत. परिस्थितीचा उलटसुलट अर्थ लावण्याची त्यांची हातोटी अजब आहे. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाला व १९७१ च्या ताज्या युद्धाला हातभार लावून पुन्हा आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर ते सद्य: परिस्थितीचे खापर फोडीत आहे. ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात की भारत-पाकिस्तानमधील वादग्रस्त प्रश्न लष्करी दृष्टीने सोडविण्याचे प्रयत्न असफल झाले आहेत. आता सहकार्य व चर्चा ह्यांचीच कास धरली पाहिजे. १९६२ साली भारत चीनशी लढत असताना पाकिस्तानला भारताच्या ताब्यातील काश्मीर सहज घेता आले असते. पण अध्यक्ष अयूबखान ह्यांनी ती संधी घेतली नाही. १९६५ च्या लढाईनंतर भारताची लष्करी तयारी वाढत गेली आणि सामर्थ्याचा समतोल बिघडला. १९७१ च्या युद्धात पाकिस्तानच्या दुर्बलतेचा भारताने फायदा घेतला.

---

### किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि.

किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि. ने जून, १९७१ अखेर संपलेल्या वर्षी ११·६२ कोटी रु. ची विक्री केली आणि निव्वळ नफा ६२ लक्ष रु. मिळविला. म्हणजे, पूर्वीच्या वर्षापेक्षा विक्रीत ४४·६% आणि निव्वळ नफ्यात ४७% वाढ झाली. ऑर्डिनरी डिव्हिडंड २·५% ने वाढवून १२·५% करण्यात आले. कंपनीने ५१ लक्ष रु. किंमतीच्या उत्पादनाची निर्यात केली. मलेशियात कंपनीच्या सहकार्याने स्थापन झालेली इंडो-मलेशिया इंजिनिअरिंग कंपनी समाधानकारक प्रगती करीत आहे.

## श्रीमंत पतीची राणी

मिसेस जॅकिलिन केनेडी अमेरिकेच्या अध्यक्षांची पत्नी म्हणून वावरत होती, तेव्हा ती सबंध जगाच्या कौतुकाची विषय झालेली होती. पतीच्या खुनानंतर तिने दाखविलेले मनोधैर्य आणि सहन केलेले दुःखही सर्वांना आदर्श वाटले. पुढे तिच्याबद्दल बऱ्याच वेड्यावाकड्या बातम्या प्रसिद्ध होऊ लागून ती जनमानसातून उतरली. छंगीफंगी कोट्यधीश ॲरिस्टॉटल ओनॅसिसशी तिने विवाह केल्यानंतर तर तिच्यासंबंधी अप्रीतीच निर्माण झाली आणि त्यानंतरच्या घटनाही ती अप्रीती वाढविण्यास कारणीभूत होणाऱ्याच आहेत. तिच्या बहिरंगा-वरून तिच्या अंतरंगाची कल्पना करणे चुकीचे ठरले. आता तिची वैयक्तिक राहणीही किती कमी दर्जाची आहे, ह्याचा तपशील प्रसिद्ध झाला आहे. "जॅकी सामान्यतः दिवसातून चार वेळा आपला पोषाख बदलते. प्रत्येक वेळी ती डझनावारी पोषाख, त्यांना मॅचिंग मोजे आणि अंडरवेअर आलटून पालटून घालून पाहते आणि नको ते जमिनीवर टाकून देते तिच्या पाठोपाठ जाऊन ते वेचावे लागतात, आणि जाग्यावर नेऊन ठेवावे लागतात. नाही तर ती संतापते. प्रवासाच्या वेळी तिच्या सामानात गुलाबी रेशमी चादरींच्या १२ जोड्या असतात. कोणत्याही चादरीवर ती दोन वेळा झोपणार नाही. दुपारी तिने १५ मिनिटे वामकुक्षी केली, तरी चादरी बदलल्याच पाहिजेत. तिचे कपडे विकून पैसे कमविण्याचा धंदा तिचे नोकर चाकर करतात. तिचा स्वेटर, शूज, निळ्या जीन्स, ह्यांना २,५०० ते ४,००० रु. किंमत येते. तिच्या अंडरवेअरला तर ८,००० रु. ते १६,००० रुपये किंमत येते. संध्याकाळी बाहेर जाण्याच्या वेळी आपण चांगले दिसावे ह्यासाठी मिसेस ओनॅसिस दिवसभर बेडमध्येच वेळ खर्च करते; केशरचना बिघडू नये म्हणून डोके वर ठेवूनच झोपते. ओनॅसिसला हे खपत नाही.

---

## पोलादाच्या उत्पादनात रशिआची आघाडी

आधुनिक अर्थव्यवस्थेत पोलाद उत्पादनाच्या धंद्याला असाधारण महत्त्व आहे. पोलादाच्या उत्पादनाच्या बाबतीत आज-पर्यंत अमेरिकेचा पहिला क्रमांक होता. आता मात्र ह्या बाबतीत रशिआने अमेरिकेला मागे टाकले आहे. १९७० साली अमेरिकेतील पोलादाचे उत्पादन ४·५ टक्क्यांनी घटले. एकूण उत्पादन ११·१७ कोटी टन झाले. उलट रशिआतील पोलादाच्या उत्पादनात ४·१ टक्क्याने वाढ होऊन एकूण उत्पादन १२ कोटी टनांपेक्षा थोडे अधिक झाले. युरोपियन सामाजिक बाजारपेठेत सामील झालेल्या देशांच्या आकडेशास्त्र शाखेने ही माहिती प्रसिद्ध केली आहे. रशिआचे दिवंगत पंतप्रधान मि. क्रुश्चाव्ह ह्यांनी आपल्या कारकीर्दीत रशिआ पोलादच्या उत्पादनाच्या बाबतीत अमेरिकेला मागे टाकील असे जाहीर केले होते. त्यांच्या पश्चात रशिआने आघाडी मारलेली आहे. तरीही इतर बाबतीत अमेरिका अजून पुढेच आहे.

## श्री. गोपाळराव श्रीखंडे ह्यांचे सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण

कोल्हापुरातील एक ख्यातमान बँकर श्री. गोपाळराव श्रीखंडे यांनी दिनांक १८ फेब्रुवारी १९७२ रोजी ७५ व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त त्यांच्या घरी श्रीसत्यनारायणाची पूजा व इतर धार्मिक विधी घरगुती व जिव्हाळ्याच्या वातावरणात साजरे करण्यात आले. युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि., युनायटेड वेस्टर्न बँक लि., बँक ऑफ कराड लि. यांचे द्वारा कोल्हापुरातील अनेक लहान–मोठ्या उद्योगांना त्यांनी उत्तेजन देऊन त्यांच्या विकासास व समृद्धीस मोठाच हातभार लावला आहे. कोल्हापूरच्या आर्थिक व औद्योगिक समृद्धीत त्यांचा मोठाच वाटा आहे. वयपरत्वे ते बँकिंग क्षेत्रातून आता निवृत्त झाले असले तरी अद्यापही त्यांचा उत्साह कायम असून कोल्हापूर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट. प्रा. लि. चे चेअरमन म्हणून ते कार्यमग्न आहेत. परमेश्वर त्यांना दीर्घायुरारोग्य देवो ही आमची शुभेच्छा.

---

## पेपर ॲंड पल्प कन्व्हर्शन्स लि.

वरील कंपनीने जून, १९७१ अखेर संपलेल्या वर्षी १·५४ कोटी रु. ची विक्री केली आणि ७·८ लक्ष रु. निव्वळ नफा मिळविला. म्हणजे पूर्वीच्या वर्षापेक्षा २३% विक्री अधिक झाली आणि १३% नफा जास्त झाला. डिव्हिडंड २% ने वाढवून १०% देण्यात आले.

---

Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

**FORM IV**

**(See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. | Place of publication | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 2. | Periodicity of its publication | Fortnightly |
| 3. | Printer's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 4. | Publisher's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 5. | Editor's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 6. | Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital | S. V. Kale<br>823 Shivajinagar Poona 4 |

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 1-3-1972 S. V. Kale
Signature of Publisher.

### खोट्या पासपोर्टांच्या साह्याने बांगला देशातून पलायन

बांगला देश स्वतंत्र झाल्यापासून अनेक रझाकारांनी आणि पश्चिम पाकिस्तानातील व्यापाऱ्यांनी छुप्या जीवनाला सुरुवात केली. अजूनही कित्येकजण भूमिगत असून भारतामधून पाकिस्तानात जाण्याची खटपट करीत आहेत. भारत व बांगला देशाच्या सरहद्दीवरील काही विवक्षित ठिकाणामधून त्यांचा प्रवास होत असतो. कलकत्त्यामधील काही धंदेवाईक टोळ्या त्यांना आश्रय देतात आणि कलकत्त्याला पोचवितात. तेथे गेल्यावर त्यांना हिंदूचे बनावट पासपोर्ट देण्यात येतात प्रत्येक पासपोर्ट-साठी २ हजार ते ४ हजारपर्यंत रकम घेण्यात येते. मग हे प्रवासी आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांची तिकिटे काढतात. काही-जण कलकत्त्याहून तर काहीजण दिल्लीहून सरळ काबूलला जातात व तेथून पाकिस्तानात पस्त जातात. हा सर्व प्रवास ते दोघातिघांच्या गटाने करतात. काहीजण मध्यपूर्वेतील एखाद्या देशात जातात व तेथून पाकिस्तानात जातात. बांगला देशांतील कुस्तिया जिल्ह्यातील काही उद्योगधंद्यांच्या मालकांशी कलकत्त्या-मधील काही कंपन्यांनी संधान बांधलेले आहे. ह्या सर्व व्यवहाराची साखळी आता चांगली बसल्यासारखे दिसते. कारण पश्चिम पाकिस्तानातून पुन्हा बांगला देशात जाऊन आपआपले कुटुंबीयही परत आणण्याचे धारिष्टही आता करण्यात येऊ लागले आहे. एक महिन्यापूर्वी असाच एक पश्चिम पाकिस्तानी उद्योगपती पळून आला होता, परंतु येताना काही जडजवाहिर आणि मौल्यवान वस्तू त्याला बरोबर आणता आल्या नव्हत्या. म्हणून हा उद्योगपती परत भारतात आला व बांगला देशातील आपली राहिलेली चीजवस्तू त्याने परत आणली. कलकत्त्यात बनावट पासपोर्ट करणाऱ्या टोळ्याच आहेत. पश्चिम पाकिस्तानात पळून गेलेल्या धनिकांचे नातेवाईक बांगला देशातून सोडवून आणण्या-साठी ह्या टोळ्यांना लक्षावधी रुपये आधीच देण्यात आले आहेत. कलकत्त्यासारख्या अवाढव्य व बकाल शहरात पासपोर्ट देणाऱ्या टोळ्यांचा तलास लावणे फारच कठीण आहे. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन दर आठवड्याला निदान १५ पाकिस्तानी अगर रझाकार पश्चिम पाकिस्तानात जात असावे असा अंदाज आहे.

---

### पुढील शतकात गोड्या पाण्याचाही तुटवडा

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एका अभ्यासगटाने जगातील गोड्या पाण्याच्या साठ्यांची व वापराची पाहणी केली आहे. पाहणीत ग्रथित केलेल्या माहितीवरून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की गोड्या पाण्याच्या वापरात काटकसर करून त्याचे साठे सतत टिकतील अशी दक्षता ताबडतोब घेण्यात आली पाहिजे. अन्यथा पुढच्या शतकात जगातील लोकांना गोड्या पाण्याचे दुर्भिक्ष चांगलेच जाणवू लागेल. येत्या जूनमध्ये स्टॉकहोम येथे भरविण्यात येणाऱ्या भूभौगिक परिस्थितीविषयक परिषदेत वरील पाहणीचा अहवाल सादर करण्यात येणार आहे. सध्या गोड्या पाण्याच्या एकूण पुरवठ्यापैकी दोन तृतियांश पुरवठा अन्नधान्याचे उत्पादन करण्यासाठी वापरण्यात येतो. ह्याचा अर्थ असा की पुढील शतकात गोड्या पाण्याचा तुटवडा भासू लागला तर पहिला फटका अन्नधान्याच्या निर्मितीला बसणार आहे. गोड्या पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठी सध्या अनेक उपाय जगभर योजण्यात येत आहेत. परंतु त्यामुळे भूतलावरील नैसर्गिक परिस्थिती बिघडत चालली आहे. काही ठिकाणी जमिनी पाणथळ अगर दलदलीच्या बनत आहेत, तर काही ठिकाणी क्षारयुक्त बनत आहेत. इतर काही ठिकाणी जमिनी धुपून जात आहेत. पाण्याचा योग्य वापर करण्यासाठी योग्य उपाय योजण्यात आले तर सध्याचा गैरवापर व नासाडी थांबविता येणे शक्य आहे. परंतु त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व पुरेसा पैसा ह्यांची आवश्यकता आहे. सध्या पृथ्वीवर पावसाच्या रूपाने अगर बर्फाच्या रूपाने जे पाणी पडते त्यांपैकी बहुतेक पाणी वाफून जाते अगर नद्यांतून वाहून समुद्राला मिळते. अवघे ६·६ टक्के पाणी साठवून वापरण्यात येते. पाण्याचा साठा वाढविण्यात आला तर जगातील लोकसंख्या वाढण्याचा धसका कमी होईल. कारण मग सध्याच्या पाचपट म्हणजे १९०० कोटी इतकी लोकसंख्या पोसण्याइतके खाद्य वस्तूचे उत्पादन होऊ शकेल. भूतलावर पडलेल्या पर्जन्याचे पाणी साठविणे आणि खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करणे हे दोनच उपाय करता येण्यासारखे आहेत. पैकी दुसरा उपाय अजून आर्थिक दृष्ट्या परवडण्या इतका कमी खर्चाचा झालेला नाही.

---

### मुसलमान स्त्रियांचे पाकिस्तानातील स्थान

पाकिस्तानातील मुसलमान स्त्रियांच्या सामाजिक स्थानाविषयी चर्चा करण्यासाठी एक परिषद कराचीत भरविण्यात आली होती. परिषदेत मुस्लीम स्त्रियांच्या हीन स्थानावर चांगलाच प्रकाश टाकण्यात आला. पाकिस्तानात स्त्रियांना मताधिकार आहे. उमेदवार म्हणूनही त्या उभे राहू शकतात. परंतु त्या निवडून येणार नाहीत हे गृहीतच धरलेले असते; म्हणून प्रांतिक मंडळावर त्यांच्यासाठी राखीव जागा असतात. स्त्रियांना नोकऱ्या मिळणे कठीण असते. नोकरीचेच ध्येय असणाऱ्या स्त्रिया अद्यापही क्वचित दिसतात. तथापि त्यांची संख्या आता ७० हजारांच्या आसपास आली आहे. त्यापैकी बहुतेक शिक्षिकेच्या अगर परिचारिकेच्या पेशात आहेत. एखादी स्त्री वृत्तपत्रात काम करीत असली तर तिला स्त्रियांच्याजोगे बैठे काम कचेरीतच देण्यात येते. आपला पती अगर पत्नी निवडण्याचे स्वातंत्र्य आहे; पण ते नाममात्रच. व्यवहारात विवाह आईबापच ठरवितात. स्त्रियांना एकटे राहता येत नाही. कुटुंबाबाहेर पडल्यास त्यांना स्त्रियांच्या वसतिगृहातच राहावे लागते. ती तर फार थोडी आहेत.

---




# पाणी.... पाणी

## हवं तेव्हा, हवं तितकं

शेतातून सोनं पिकवायचं असेल तर पिकाला वर्षभर, हवं तेव्हा – हवं तितकं पाणी मिळायला हवं.

त्या साठी भरवश्याचं
असं 'एकच'


# किर्लोस्कर एंजिन

३ ते १५ हार्स पॉवर


किर्लोस्कर

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स
लिमिटेड,
रजि. ऑफिस–एल्फिन्स्टन रोड, पुणे-३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे. Tom & Bay/KO-7182-M




इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो
त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता
आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड
पाणीपुरवठा करतात.



कारखानदार—

# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )

फोन : १३१ तार : IVwpijoay

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में वे कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

बर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७६१०२

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)